महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र. :तंशिविकापु/संकीर्ण/प्र.क्र.६९/समन्वय/२०२४-२५/ 4359
दिनांक : 28 OCT 2024

# परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्था,
पुणे विभाग

**विषय :** दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्याबाबत..
दिनांक २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२४

**संदर्भ :** १. सामान्य प्रशासन विभाग यांचे दि. २४/१०/२०२४ रोजीचे पत्र
२. सामान्य प्रशासन विभाग यांचे दि. २४/१०/२०२४ रोजीचे शासन परिपत्रक
३. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र संकीर्ण - २०२४/प्र.क्र.६९/समन्वय,दि.२५/१०/ २०२४

उपरोक्त विषयांस अनुसरून संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, या परिपत्रकासोबत जोडलेल्या सहपत्राचे अवलोकन करून त्यानुसार कार्यवाही करावी.

राज्यात दरवर्षी दक्षता जनजागृती सप्ताह ( Vigilance Awareness Week ) आयोजित करण्याचा निर्णय दि.२२ ऑक्टोबर २०२१ च्या शासन आदेशान्वये घेण्यांत आला आहे. या वर्षी **२८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२४** या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यांत येणार असल्याचे केंद्रिय दक्षता आयोगाने जाहीर केले आहे. या सप्ताहाकरीता या वर्षी **" सत्यनिष्ठेच्या संस्कृतीच्या माध्यमातून राष्ट्र समृध्दी "** ( culture of Integrity for Nation's Prosperity ) ही संकल्पना निश्चित करण्यांत आली आहे.

त्या नुसार राज्यातदेखील या वर्षी **२८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२४** या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करावयाचे आहे. या संदर्भात सामान्य प्रशासन विभाग यांचे दि. २४/१०/२०२४ रोजीचे शासन परिपत्रकानुसार देण्यांत आलेल्या सुचनांचे पालन करावे. व या सप्ताहाच्या निमित्ताने परिपत्रकांत नमूद केलेल्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यांत येऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयांस सादर करावा.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत : संदर्भिय क्र.१ व २ चे पत्र/परिपत्रक

प्रत - १. प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID :- do.asthahte-mh@ gov.in

क्रमांक:- संकीर्ण-२०२४/प्र.क्र.६९/समन्वय दिनांक:- २५.१०.२०२४

प्रति,

१. संचालक, (उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण/कला/ग्रंथालय), महाराष्ट्र राज्य,मुंबई/पुणे.

२. कक्ष अधिकारी, आस्था-१उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.

**विषय**- दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्याबाबत.
दिनांक २८ ऑक्टोबर ते ०३ नोव्हेंबर २०२४

**संदर्भ**- १. सामान्य प्रशासन विभाग यांचे दिनांक २४.१०.२०२४ रोजीचे पत्र.
२. सामान्य प्रशासन विभाग यांचे दिनांक २४.१०.२०२४ रोजीचे शासन परिपत्रक.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भाधीन पत्राचे अवलोकन करावे.

२. सदर पत्रामध्ये सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २८.१०.२०२४ व दिनांक ०३.११.२०२४ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करावा, असे नमुद केले आहे.

३. त्यास अनुसरुन सदर पत्रावर आपल्या स्तरावर नियमोचित कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

(विशाल. वि. ताठे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत:- वरीलप्रमाणे

प्रत माहितीसाठी,

१. निवडनस्ती (समन्वय)

Scanned with OKEN Scanner

Reply all | ∨   Delete   Junk | ∨   ...   ×

# Vigilance Week on 28.10.2024 to 03.11.2024.

Addl CP ACB Mumbai <addlcpacbmumbai@mahapolice.gov.in>   Reply all | ∨

Thu 10/24/2024 3:15 PM

To: cst@mahagst.gov.in; rvhwr rvhwr <rvhwr@airindia.in>; dclmms@yahoo.in; dclmms complaints <dclmms_complaints@yahoo.in>; Sunil Chavan; Anil Taksale <dycor.ho-mum@gov.in>; pnghorade@mumbaidistrictbank.com; vigilance@mahavat.gov.in; AMOGH SHYAMKANT KALOTI <cc.mum-mh@gov.in>; Sujata Saunik; Joint Secretary, CS Office; Shri Vikas Kharage; Mr.Brijesh Singh; JAYSHREE BHOJ; Rajesh Kumar; Anoop Kumar; CEO Maharashtra <ceo_maharashtra@eci.gov.in>; APARNAARVINDGAWDE JOINT SECRETARY <aparna.gawde@nic.in>; dg.dgipr; StateElectionCommission Maharashtra <sec.mh@gov.in>; Vikas Chandra Rastogi; Vandana Krishna; Abha Shukla; Pravin Darade; Mr. O P Gupta; Ashish Kumar Singh; Shaila A; Saurabh Vijay; RANJIT SINGH DEOL, Principal Secretary (FCS&CP); Nitin Gadre; Seema Vyas; Valsa Nair Singh1; Milind Mhaiskar; Manisha Patankar-Mhaiskar; Secretary SDC; Sujata Saunik; Parrag Jaiin Nainutia; Nima Arora; Dr. I. S. CHAHAL; Radhika Rastogi; Shri Anup Kumar Singh; Sanjay Sethi. Additional Chief Secretary.; Milind mhaiskar; Dr. Harshadeep Kamble; Development Commissioner Industries; RAJESH KUMAR; Shri. Satish B. Waghole

94399
24/10/2024.

Inbox







दक्षता सप्ताह 2024 पत्र-1.p... ∨
333 KB

दक्षता सप्ताह 2024 --2.pdf ∨
3 MB

Vigilance Week
192 KB

Show all 7 attachments (6 MB)   Download all

**Sir,**

Please find attached Letter O.W. No. 7898/ACB//Mumbai/2024, Dt. 23.10.2024, from Anti Corruption Bureau, Mumbai.

Thanking you.

24/10

**( Sandeep Diwan )** ***IPS***
Addl. Commissioner Of Police,
Anti Corruption Bureau,
Mumbai Unit.

Scanned with OKEN Scanner

ıtyal

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
महाराष्ट्र राज्य

# भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र

लाचखोरीला कंटाळलात?
डायल करा!

टोल फ्री क्रमांक 1064

9930 99 7700

भ्रष्टाचारासंबंधी तक्रार
येथे नोंदवा

acbmaharashtra.gov.in
acbmaharashtra.net
acbwebmail@mahapolice.gov.in
www.facebook.com-MaharashtraACB
@ACB_Maharashtra

लाच देणे आणि लाच घेणे
दंडणीय अपराध आहे.



लाचखोरीला कंटाळलात?
डायल करा!

टोल फ्री क्रमांक 1064

9930 99 7700

भ्रष्टाचारासंबंधी तक्रार
येथे नोंदवा

acbmaharashtra.gov.in
acbmaharashtra.net
acbwebmail@mahapolice.gov.in
www.facebook.com-MaharashtraACB
@ACB_Maharashtra

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य

Scanned with OKEN Scanner

"जनहिताय सर्वदा"

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), सातवा मजला, दालन क्र.७२५, मुंबई - ४०००३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०२३१२१ ❖ ई– मेल- desk11a-gad@mah.gov.in

नोंदणीकृत डाकेने/By mail

**क्रमांक: दजस-२०२४/प्र.क्र.४७/विचौ-२(११-अ)**
**दिनांक : २४ ऑक्टोबर, २०२४.**

प्रति,

महासंचालक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी,
मुंबई.

**विषय - दक्षता जनजागृती सप्ताह (Vigilance Awareness Week) साजरा करण्याबाबत. दिनांक २८ऑक्टोबर ते ०३ नोव्हेंबर, २०२४**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, भ्रष्टाचाराविरुद्धच्या जनजागृतीच्या उपायांचा भाग म्हणून यावर्षी **दिनांक २८ ऑक्टोबर ते ०३ नोव्हेंबर, २०२४** या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करावयाचे आहे. याबाबतचे शासन परिपत्रक, दिनांक २४.१०.२०२३ ची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे.

२. या विभागाच्या दि.२२.१०.२००१ च्या शासन परिपत्रकान्वये, राज्यात दक्षता जनजागृती सप्ताहाच्या आयोजनासंबंधीची जबाबदारी आपणावर सोपविण्यात आली आहे. यास्तव दिनांक २४.१०.२०२३ च्या शासन परिपत्रकानुसार आवश्यक ती कार्यवाही करुन शासनास अहवाल सादर करावा, अशी आपणास विनंती करण्यात येत आहे.

आपली,

Vidya 24/10/2024

**( विद्या पाटील )**
**कक्ष अधिकारी**

**सोबत-वरीलप्रमाणे.**

प्रत- कार्यासन विचौ-२ संग्रहार्थ

Scanned with OKEN Scanner

दक्षता जनजागृती सप्ताह
साजरा करण्याबाबत.
दि.२८ ऑक्टोबर, २०२४ ते ३ नोव्हेंबर, २०२४

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: दजस-२०२४/प्र.क्र.४७/विचौ-२ (११-अ)**
**मंत्रालय, मुंबई -४०००३२**
**दिनांक - २४ ऑक्टोबर, २०२४**

पहा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२००१/११२८/ प्र.क्र.४३/०१/११-अ, दिनांक : २२ ऑक्टोबर, २००१

**परिपत्रक**

राज्यात दरवर्षी दक्षता जनजागृती सप्ताह (Vigilance Awareness Week) आयोजित करण्याचा निर्णय संदर्भाधीन दिनांक २२ ऑक्टोबर, २००१ च्या शासन आदेशान्वये घेण्यात आला आहे. यावर्षी **दि.२८ ऑक्टोबर, २०२४ ते ३ नोव्हेंबर, २०२४** या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे केंद्रीय दक्षता आयोगाने जाहीर केले आहे. या सप्ताहाकरीता यावर्षी **"सत्यनिष्ठेच्या संस्कृतीच्या माध्यमातून राष्ट्र समृध्दी"** (**Culture of Integrity for Nation's Prosperity**) ही संकल्पना निश्चित करण्यात आली आहे.

२. त्यानुसार राज्यातदेखील यावर्षी दिनांक **दि.२८ ऑक्टोबर, २०२४ ते ३ नोव्हेंबर, २०२४** या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे (Vigilance Awareness Week) आयोजन करावयाचे आहे. या संदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत-

अ) राज्य शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख, राज्य शासनाचे अंगीकृत उपक्रम, सहकारी संस्था, स्वायत्त संस्थांमार्फत वरील कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात यावे.

ब) दिनांक २८ ऑक्टोबर,२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता भ्रष्टाचार निर्मूलनाच्या प्रतिज्ञेने कार्यक्रमाचा प्रारंभ होईल. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख किंवा ज्येष्ठतम अधिकारी यांच्या उपस्थितीत सर्व अधिकारी / कर्मचारी प्रतिज्ञा करतील. (प्रतिज्ञेचा नमुना सोबत जोडला आहे.)

क) प्रतिज्ञा केल्यानंतर मा. राज्यपाल व मा. मुख्यमंत्री यांनी या सप्ताहानिमित्त दिलेला संदेश उपस्थितांना वाचून दाखविण्यात येईल. ( संदेशांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.)

ड) या सप्ताहाच्या निमित्ताने मा. राज्यपाल महोदयांचा संदेश राज्यातील जनतेसाठी प्रसृत करण्यात यावा.

Scanned with OKEN Scanner

३. या सप्ताहाच्या निमित्ताने पुढीलप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे -

अ) कार्यालयांच्या दर्शनी भागात व सार्वजनिक ठिकाणी (जसे, रेल्वेस्थानक, बसथांबे, विमानतळे, इत्यादि) भ्रष्टाचार निर्मूलन जनजागृतीविषयक भित्तिपत्रके/ कापडी फलक/साईन बोर्ड लावण्यात यावेत. व्हॉट्सॲप, इत्यादि इलेक्ट्रॉनिक समाजमाध्यमांचा, ई-मेल्स, एस.एम.एस. यांचाही जनजागृतीसाठी वापर करावा.

ब) मुंबई, पुणे यासारख्या मोठया शहरांतील मोक्याच्या ठिकाणी व्हेरीएबल मेसेज सिस्टिम बोर्डांद्वारे भ्रष्टाचार निर्मुलन जनजागृतीविषयक संदेश प्रसारीत करण्यात यावेत.

क) भ्रष्टाचाराच्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकण्यासाठी कार्यालये/शाळा/ महाविद्यालयांच्या स्तरावर वादविवाद स्पर्धा/व्याख्याने/ निबंधस्पर्धा/ कार्यशाळा/ चर्चासत्र/मुलाखती यांचे आयोजन करावे.

ड) भ्रष्टाचार निर्मूलन जनजागृतीविषयक विशेष पुस्तिकांचे प्रकाशन व वाटप करावे.

इ) राज्यातील अशासकीय संघटना, स्वयंसेवी संस्था, सामान्य नागरीक यांना दक्षता जनजागृती मोहिमेत मोठया प्रमाणावर/उत्स्फुर्तपणे सहभागी होण्याकरीता आवाहन करावे. त्याकरीता पथनाट्ये /नाटिका, काव्यवाचन, इ. नाविन्यपूर्ण व आकर्षक योजना/ कार्यक्रमांची आखणी करावी.

फ) राज्य शासनाचे सर्व विभाग, विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांत भ्रष्टाचार निर्मूलन जनजागृतीविषयक विविध स्पर्धा/ व्याख्याने/ निबंधस्पर्धा इ. उपक्रमांचे आयोजन करावे.

४. या सप्ताहाच्या आयोजनासाठी स्वतंत्रपणे निधी उपलब्ध करुन दिला जाणार नसल्याने प्रत्येक कार्यालयाने त्यांच्याकडील उपलब्ध निधीतूनच खर्च करावयाचा आहे.

५. दक्षता जनजागृती सप्ताहाच्या आयोजनासंबंधीची जबावदारी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांनी सदर सप्ताहाचे आयोजन करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

६. *दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करताना राज्यात लागू असलेल्या आदर्श आचार संहितेचा कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही, याबाबतची दक्षता घेण्यात यावी.*

७. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या सूचना त्यांच्या आधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुचिता महाडिक)
**सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

**सोबत- सहपत्रे**

प्रति,

राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,

मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव,
उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव,
उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव,
विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा,
विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद,
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
* महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
* महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख,
सर्व विधीमंडळ सदस्य,
* सामान्य प्रशासन विभागाची आस्थापना शाखा, मंत्रालय, मुंबई ३२.
निवडनस्ती - कार्यासन विचौ-२ (११अ)
*पत्राने

Scanned with OKEN Scanner

**प्रतिज्ञा**

आपल्या देशाच्या आर्थिक. राजकीय आणि सामाजिक प्रगतीमध्ये भ्रष्टाचार हा प्रमुख अडथळा आहे असे मला वाटते. भ्रष्टाचार निर्मुलनासाठी सरकार, नागरिक आणि खाजगी क्षेत्र या सर्व घटकांनी संघटितपणे काम करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

प्रत्येक नागरिकाने दक्ष राहायला पाहिजे आणि सदैव प्रामाणिकपणा व सचोटी यांच्या उच्चतम मानकांप्रती वचनबध्द असायला हवे आणि भ्रष्टाचाराविरुध्द लढा देण्यासाठी साथ दिली पाहिजे याची मला जाणीव आहे.

म्हणून मी प्रतिज्ञा घेतो की :

- जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सच्चेपणा आणि कायद्याचे पालन करेन.
- लाच घेणार नाही आणि लाच देणार नाही.
- सर्व कामे प्रामाणिकपणाने आणि पारदर्शक पद्धतीने करेन.
- जनहितासाठी कार्य करेन.
- व्यक्तिगत वागणूकीत सचोटी दाखवून उदाहरण घालून देईन.
- भ्रष्टाचाराच्या कोणत्याही घटनेची माहिती योग्य अभिकरणास देईन.

Scanned with OKEN Scanner

10/25/24, 2

Er

दक्षता जनजागृती सप्ताह (Vigilance Awareness Week) साजरा करण्याबाबत.
दि.३१ ऑक्टोबर, ते ६ नोव्हेंबर

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२००१/११२८/प्र.क्र. ४३/०१/११-अ,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २२ ऑक्टोबर, २००१.

**शासन निर्णय :-**

राज्यात गतवर्षी प्रथमच दि. ३१ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर, २००० या कालावधीत "दक्षता जागरुकता सप्ताह" (Vigilance Awareness Week) आयोजित करण्यात आला होता. जनतेमध्ये भ्रष्टाचाराबाबत जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने सदर उपक्रम अत्यंत उपयुक्त सिध्द झाल्याने आता, प्रतिवर्षी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दि.३१ ऑक्टोबर या जन्मदिवसापासून एक आठवडा (दि. ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर) या कालावधीत "दक्षता जनजागृती सप्ताहाचे"(Vigilance Awareness Week) आयोजन करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला आहे.

दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करताना पुढे नमूद केलेल्या मार्गांचा अवलंब करण्यात यावा.

अ) राज्य शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/ कार्यालय प्रमुख, राज्य शासनाचे अंगीकृत उपक्रम, सहकारी संस्था, स्वायत्त संस्थामार्फत सप्ताहाचे आयोजन करण्यात यावे.

ब) दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० वाजता भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेऊन कार्यक्रमाचा प्रारंभ होईल. विभाग/ कार्यालय प्रमुख किंवा उपस्थितांपैकी ज्येष्ठतम अधिकारी सर्वांना शपथ देतील. (शपथेचा नमुना सोबत जोडला आहे.)

क) शपथ घेतल्यानंतर मा.राज्यपाल व मा.मुख्यमंत्री यांनी या सप्ताहानिमित्त दिलेला संदेश उपस्थितांना वाचून दाखविण्यात येईल.

ड) या सप्ताहाच्या निमित्ताने मा.राज्यपाल व मा.मुख्यमंत्री यांचा संदेश राज्यातील जनतेसाठी प्रसृत करण्यात यावा.

इ) या सप्ताहाच्या निमित्ताने पुढील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

१. कार्यालयाच्या दर्शनी भागात व मोक्याच्या ठिकाणी भित्तीपत्रक, कापडी फलक लावणे.
२. कार्यालये/शाळा/महाविद्यालयांमध्ये भ्रष्टाचाराच्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकण्यासाठी चर्चासत्रे/ वादविवाद स्पर्धा/व्याख्याने/निबंधस्पर्धा/कार्यशाळा यांचे आयोजन करणे.
३. विशेष पुस्तिकांचे (Special Journal) प्रकाशन करणे.
४. राज्यातील अशासकीय संघटना, स्वयंसेवी संस्था, सामान्य नागरीक यांना दक्षता जनजागृती मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करणे.

कृ.मा.प.

Scanned with OKEN Scanner

५. केंद्रीय दक्षता आयोगाच्या http://www.cvc.nic.in या संकेतस्थळावर (Web-site) उपलब्ध साहित्याचा जनतेमध्ये वितरणासाठी उपयोग करणे.

याव्यतिरिक्त कार्यालयीन इमारतीच्या दर्शनी भागावर "भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध विभागाशी संपर्क साधावा" अशी सूचना व लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या स्थानिक कार्यालयाचा पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक लिहिलेला कायमस्वरुपी फलक लावण्यात यावा.

या सप्ताहाच्या आयोजनासाठी स्वतंत्रपणे निधी उपलब्ध करुन देता येणार नसल्याने प्रत्येक कार्यालयाने त्यांच्याकडील उपलब्ध निधीतूनच खर्च करावा.

दक्षता जनजागृती सप्ताहाच्या आयोजनासंबंधीची जबाबदारी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंध विभाग यांच्यावर सोपविण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वी.के.अग्रवाल)
शासनाचे अपर मुख्य सचिव.

प्रति,

राज्यपालांचे प्रधान सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान सभा सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान परिषद सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
* आयुक्त राज्य निवडणूक आयोग, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख,
सा.प्र.विभागातील सर्व प्रशासकीय कार्यासने.



Scanned with OKEN Scanner




सी. पी. राधाकृष्णन

राजभवन
मलबार हिल
मुंबई ४०० ०३५

राज्यपाल, महाराष्ट्र


१३ सप्टेंबर २०२४

# शुभेच्छा

भ्रष्टाचारविरुद्धच्या जनजागृतीच्या उपायांचा भाग म्हणून यावर्षी दिनांक २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

यंदाच्या दक्षता जनजागृती सप्ताहाचे ब्रीदवाक्य 'सत्यनिष्ठेच्या संस्कृतीच्या माध्यमातून राष्ट्र समृद्धी' हे ठेवण्यात आले आहे. प्रतिबंधात्मक दक्षता उपायांचा भाग म्हणून सर्व कार्यालये व संस्थांना क्षमता वाढवण्याचे, संस्थात्मक सुधारणेचे, परिपत्रके, मार्गदर्शक तत्त्वे आणि नियमावलीचे अद्ययावतीकरण करण्याचे, प्रलंबित तक्रारींचा निपटारा करण्याचे आणि डिजिटल माध्यमांवर उपस्थिती सुधारण्यासाठी उपक्रम घेण्याचे आवाहन करतो. विकसित भारताचे उद्दिष्ट गाठण्यासाठी भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन होणे आवश्यक आहे व त्यासाठी निरंतर दक्षता ठेवणे आवश्यक आहे.

दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त सर्वांना भ्रष्टाचार मुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी वचनबद्ध होण्याचे आवाहन करतो व सप्ताहाच्या सफलतेसाठी आपल्या शुभेच्छा देतो.

Scanned with OKEN Scanner

**Email** **Amol Shamsunder Mutyal**

## [WARNING: ATTACHMENT UNSCANNED]Fw: Vigilance Week on 28.10.2024 to 03.11.2024.

**From :** psec higheredu <psec.higheredu@maharashtra.gov.in> Thu, Oct 24, 2024 04:52 PM
**Subject :** [WARNING: ATTACHMENT UNSCANNED]Fw: Vigilance Week on 28.10.2024 to 03.11.2024. 9 attachments
**To :** PRATAP PANDURANG LUBAL <ds.sashi-hted@mah.gov.in>

---

**From:** Addl CP ACB Mumbai <addlcpacbmumbai@mahapolice.gov.in>
**Sent:** Thursday, October 24, 2024 3:14 PM
**To:** cst@mahagst.gov.in; rvhwr rvhwr; dclmms@yahoo.in; dclmms complaints; Sunil Chavan; Anil Taksale; pnghorade@mumbaidistrictbank.com; vigilance@mahavat.gov.in; AMOGH SHYAMKANT KALOTI; Sujata Saunik; Joint Secretary, CS Office; Shri Vikas Kharage; Mr.Brijesh Singh; JAYSHREE BHOJ; Rajesh Kumar; Anoop Kumar; CEO Maharashtra; APARNAARVINDGAWDE JOINT SECRETARY; dg.dgipr; StateElectionCommission Maharashtra; Vikas Chandra Rastogi; Vandana Krishna; Abha Shukla; Pravin Darade; Mr. O P Gupta; Ashish Kumar Singh; Shaila A; Saurabh Vijay; RANJIT SINGH DEOL, Principal Secretary (FCS&CP); Nitin Gadre; Seema Vyas; Valsa Nair Singh1; Milind Mhaiskar; Manisha Patankar-Mhaiskar; Secretary SDC; Sujata Saunik; Parrag Jaiin Nainutia; Nima Arora; Dr. I. S. CHAHAL; Radhika Rastogi; Shri Anup Kumar Singh; Sanjay Sethi. Additional Chief Secretary.; Milind mhaiskar; Dr. Harshadeep Kamble; Development Commissioner Industries; RAJESH KUMAR; Shri. Satish B. Waghole
**Subject:** Vigilance Week on 28.10.2024 to 03.11.2024.

Sir,

Please find attached Letter O.W. No. 7898/ACB//Mumbai/2024, Dt. 23.10.2024, from Anti Corruption Bureau, Mumbai.

Thanking you.

**( Sandeep Diwan )** ***IPS***
Addl. Commissioner Of Police,
Anti Corruption Bureau,
Mumbai Unit.



Scanned with OKEN Scanner

८९९८

जा.क्र. /अपोआ/लाप्रवि/बृमुंवि/दजस-२४/२०२४

अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी,
मुंबई - ४०० ०३०. दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :-२२/१०/२०२४

विषय :- दिनांक २८ ऑक्टोबर, २०२४ ते ०३ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे (Vigilance Awareness Week) आयोजनाबाबत.

महोदय,

राज्यात प्रतिवर्षी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दिनांक ३१ ऑक्टोबर या जन्म दिवसापासून एक आठवडा ''दक्षता जनजागृती सप्ताहाचे'' (Vigilance Awareness Week) आयोजन करण्यात येते. या वर्षी **दिनांक २८ ऑक्टोबर, २०२४ ते ०३ नोव्हेंबर, २०२४** या कालावधीत **''दक्षता जनजागृती सप्ताहाचे''** (Vigilance Awareness Week) आयोजन करण्यात येत आहे.

केंद्रीय दक्षता आयोग यांचेकडील Circular No. 09/08/2024 O.W. 024/VGL/081, dated 28/08/2024 अन्वये ''दक्षता जनजागृती सप्ताह'' (Vigilance Awareness Week) आयोजनासंदर्भात नमुद केल्या सुचनांप्रमाणे सप्ताहादरम्यान विविध दक्षता जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करावे ही विनंती.

तसेच शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२००१/११२८/प्र.क्र.४३/०१/११-अ/मंत्रालय, मुंबई, दिनांक २२ ऑक्टोबर, २००१ चे कृपया अवलोकन व्हावे, नमुद शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे आपले कार्यालयीन इमारतीच्या दर्शनी भागावर **''भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा'' संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानावाला मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८, टोल फ्रि क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८,** असा सुचनावजा फलक कायमस्वरुपी लावण्यात यावा ही विनंती.

सोबत नमुद परिपत्रकांच्या छायांकित प्रती आपले माहिती व पुढील कार्यवाहीकरीता यासोबत जोडल्या आहेत.

आपला विश्वासू,

( संदीप दिवाण )
अपर पोलीस आयुक्त ,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

**प्रत माहितीकरीता -**

अपर पोलीस अधीक्षक (मुख्यालय), लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

Scanned with OKEN Scanner